Shivaji College of Arts
Hingoli

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - III January - March - 2019

## Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Lecturer
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli (M.S.)

Shivaji College of Art's Hingoli

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**.

Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Published by :**

Ajanta Prakashan, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, Ph.No. : (0240) 2400877
E-mail : ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 5.5** (www.sjifactor.com)

Lecturer
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli (MS.)

Shivaji College of Art's Hingoli

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

Shivaji College of Art's Hingoli

# CONTENTS OF MARATHI PART - II

| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १ | कार्यकुशल समाजउध्दारक : महात्मा ज्योतीराव फुले<br>**प्रा. विलास सोमाजी पवार** | १-६ |
| २ | महात्मा फुले यांच्या विचारातील कृषि अर्थशास्त्र<br>**डॉ. निलम एम. छंगाणी** | ७-११ |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चलन विषयक विचार आणि समकालीन प्रासंगिकता<br>**डॉ. डि. के. राठोड** | १२-१५ |
| ४ | समाजशास्त्रीय व सांस्कृतीक दृष्टीकोणातून मानसशास्त्रज्ञांचे योगदान<br>**प्रा. संतोष उमाकांत पस्तापूरे** | १६-२० |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : मार्क्सवाद, उदारमतवाद आणि बौध्दवाद<br>**डॉ. एस. एस. पवार** | २१-२३ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक लोकशाही विचार<br>**डॉ. फोले संभाजी कोंडबाजी** | २४-२६ |
| ७ | सामाजिक प्रबोधनासाठी गर्दे वाचनालयाची भूमिका<br>**प्रा. प्रदिप बारड** | २७-२९ |
| ८ | भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये भारतीय विचारवंताची प्रासंगिकता<br>**प्रा. डॉ. स्वाती विकासराव कुरमे** | ३०-३३ |
| ९ | वीर वामनराव जोशी यांचे सामाजिक चळवळीतील योगदान<br>**प्रा. संतोष गोपाळराव कुळकर्णी** | ३४-३७ |
| १० | भारतीय राजकीय विचारवंतांचे सद्यस्थितीत योगदान : विशेष संदर्भ पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. राजेश सुभाष चालीकवार** | ३८-४१ |
| ११ | राजर्षी शाहू महाराजांचे कृषि विषयक विचार<br>**प्रा. मोहोकार हरिहर शिवदास** | ४२-४३ |
| १२ | भारतातील सामाजिक चळवळीत विचारवंताचे ऐतिहासिक योगदान<br>**प्रा. होमराज टी. राठोड** | ४४-४८ |
| १३ | सामाजिक चळवळीतील विचारवंतांचे ऐतिहासिक योगदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. मीता दिनकरराव कांबळे** | ४९-५२ |



Lecturer
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विकासात्मक चळवळीतील योगदान<br>**डॉ. संतोष दामोदर पेठे** | ५३-५६ |
| १५ | साहित्यीक हमीद दलवाई यांचे सामाजिक योगदान<br>**प्रा. प्रितम वसंतराव गावंडे** | ५७-६१ |
| १६ | सामाजिक सुधारणेच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>**डॉ. संजय ब. चौधरी** | ६२-६५ |
| १७ | रँके व इतिहास लेखन<br>**प्रा. अनंत रिंढे** | ६६-६८ |
| १८ | मराठी साहित्याचे सामाजिक योगदान<br>**प्रा. डॉ. संगीता मुंढे** | ६९-७१ |
| १९ | सामाजिक चळवळीत छत्रपती शाहू महाराजांचे योगदान<br>**डॉ. देविदास श्रीराम भगत** | ७२-७४ |
| २० | सामाजिक चळवळीत विचारवंतांचे ऐतिहासिक योगदान<br>**डॉ. महेश प्रल्हादराव गोमासे** | ७५-७९ |
| २१ | राजर्षी शाहू महाराज यांचे आरक्षण चळवळीतील योगदान<br>**प्रा. सुधीर नारायणराव देशमुख** | ८०-८३ |
| २२ | सामाजिक परिवर्तनात गृहअर्थशास्त्राचे योगदान<br>**डॉ. प्रभा चिंचखेडे** | ८४-८७ |
| २३ | सामाजिक सुधारणेच्या सामाजिक विचारवंताचे योगदान<br>**प्राचार्य डॉ. व्ही. एन. जायले**<br>**प्रा. सपना जु. जयस्वाल** | ८८-९२ |
| २४ | सामाजिक विचारवंत आणि सामाजिक सुधारणा<br>**डॉ. संगीता ओ. तिहीले** | ९३-९६ |
| २५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सामाजिक प्रबोधनातील योगदान<br>**प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके** | ९७-९९ |
| २६ | सामाजिक विकासात संत महात्मा बसवेश्वरांचे ऐतिहासिक योगदान<br>**डॉ. उद्धव न. कांबळे** | १००-१०३ |





Lecturer
Shivaji College, Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)

VOLUME - VIII, ISSUE – I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

Shivaji College of Art's Hingoli

# १८. मराठी साहित्याचे सामाजिक योगदान

**प्रा. डॉ. संगीता मुंढे**
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

समाज आणि साहित्य यांचा संबंध बिंब आणि प्रतिबिंब अशा स्वरूपाचा आहे. श्रेष्ठ साहित्य हे समाजाला समांतर असे असते. समाजाला दिशा देण्याचे, मार्गदर्शन करण्याचे काम साहित्य प्राचिन काळापासून करत आले आहे. म्हणूनच मम्मटाने 'व्यवहार ज्ञान' हे एक साहित्याचे प्रयोजन मानले आहे. साहित्य ही एक कला मानली तरी केवळ आनंद देने हा उद्‌देश साहित्याचा कधीच नव्हता. वास्तवापासून दूर नेणारे साहित्य हे काळाच्या ओघात टिकू शकत नाही. निव्वळ कल्पनारम्य, मनोरंजनात्मक साहित्य हे तात्कालीक समाधान देणारे असते. तर जीवनानुभवाचे दर्शन घडवणारे, जीवनाला पुरक असे साहित्य काळावर मात करून टिकून रहाते. या बाबतीत मराठी साहित्याचा विचार केला तर संत साहित्याचे उदाहरण देता येईल. संत साहित्य हे काळाला समांतर असे, वास्तवाचे भान आणि जाण असणारे असे होते म्हणून ते आजही कालोघात तेवढयाच समर्थपणे टिकून आहे. तर पंडिती साहित्य हे काळाचे भान न ठेवणारे, मंनोरंजनात्मक साहित्य असल्यामुळे कालोघात ते आपला ठसा उमटवू शकले नाही. साहित्य हे समाजाला दिशा दाखवण्याचे, मार्ग दाखवण्याचे काम करत असते. साहित्यातून मानवी मूल्याची रूजवणूक होत असते. लहानावर संस्कार करण्याचे, मोठयाना मार्गदर्शन करण्याचे, सामाजिक प्रश्नाप्रती विचारप्रवृत्त, कार्यप्रवृत्त करण्याचे काम साहित्य करत असते. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यासाठी मनोभूमिका तयार करण्याचे काम तत्कालिन साहित्यिकांनी केलेले पाहायला मिळते. तत्कालीन विचारवंतानी लिहिलेल्या अग्रलेखतून, निबंध लेखातून संपूर्ण समाजजीवन ढवळून काढले होते. 'क्रांतीचा जयजयकार' सारख्या कविता स्वातंत्र्य लढयातील स्फुर्तीगीत बनले होते. माणसाला आंर्तबाहय बदलून टाकण्याचे सामर्थ्य एका चांगल्या ग्रंथात असते. मानवी जीवनाला प्रेरणा देण्याचे काम साहित्य करत असते. प्राचिन काळी वारंवार होणाऱ्या परकीय आक्रमणाच्या काळात आपली भाषा, संस्कृती टिकवून ठेवण्याचे काम तत्कालीन महानुभाव व संतसाहित्याने केले. समाजाच्या नैतिक अवनतीला रोखण्याचे कामही साहित्यानेच केलेले पाहायला मिळते.

साहित्यिक हा समाजाचाच एक घटक असतो. तो ज्या समाजात जीवन जगतो त्या समाजाच्या काही धर्मकल्पना, रूढी, आचारविचार, तत्वप्रणाली असतात. या सर्वातून त्या त्या समाजगटाची जगण्याची एक पद्धत तयार झालेली असते. अशा समाजगटात काही लेखक जन्माला येतात आणि त्या समाजगटाच्या जगण्याच्या पद्धतीने त्यांचेही जगणे प्रभावित होत असते. हा प्रभाव त्यांच्या साहित्यावर जाणवत असतो. हा प्रभाव लेखक गणित वेगवेगळा असतो. समाजामध्ये जीवन जगत असताना एक व्यक्ती म्हणून लेखकाची जडणघडण होत असते. लेखक हा एक संवेदनशिल व्यक्ती असल्यामुळे आपल्यावर झालेल्या सामाजिक संस्काराचा स्वीकार करून त्याला कलात्मक रूप देण्याचा प्रयत्न करतो तर कधी हे सर्व नाकारून स्वतःची स्वतंत्र प्रतिक्रीया देत असतो.या सगळया पाठीमागे त्याचे सामाजिक जीवन असते.

Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

दिगंबर पाध्ये म्हणतात, "ललित साहित्यकृतीत समाजाचे केवळ वर्णन वा विश्लेषण नसते. तेथे प्रतिभावंताने प्रकट वास्त[illegible] धडपडीचा घेतलेला शोध असतो. विशिष्ट काळातील व्यक्ती तो समाज कसा अनुभवतात, त्यांना तो कसा जाणवतो हे कथा कादंबरी सारख्या साहित्यप्रकारांतून ठळकपणे प्रकट होत असते."[१] म्हणूनच समाजजीवनाचा अभ्यास करण्यासाठी त्या त्या काळातील साहित्य हे महत्वाची भूमिका बजावत असते. उदा. महानुभाव साहित्य हे तेराव्या शतकातील सामाजिक जीवनाचा दस्तऐवज आहे असे म्हणावे लागते. तत्कालिन सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवन समजून घेण्यासाठी लिळाचरित्रादी ग्रंथ महत्वाचे ठरतात. हे साहित्य त्या त्या काळातिल सामाजिक दस्तऐवज तर असतोच पण ते पुढील पिढीसाठी पथदिप असते. त्यातून समाजाच्या संस्कृतिचं, ज्ञानाचं वहन होत असतं. समाजाची ध्येय धोरणे प्रकट होत असतात. शिवाजी महाराजांसारख्या मुत्सद्दी काळाच्या पुढे जाणाऱ्या व्यक्तीमत्वाची ध्येय धोरणे पुढच्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरतात म्हणून 'आज्ञापत्र' सारखा ग्रंथ लिहिला गेला. जो की आजच्या काळातही तेवढाच मौलिक आहे. समाजसुधारकांनी साहित्याचा वापर हा समाजात अनुकुल बदल घडवण्यासाठी केलेला पाहायला मिळतो. महात्मा फुले, अण्णभाऊ साठे, वि. दा. सावरकर, लोकहितवादी इत्यादिनी आपली लेखनी सताजहितासाठी झीजवली. समाजातिल वाइट प्रथा, परंपरेवर, अधःश्रद्धेवर हल्ला साहित्यातूनच केलेला पाहायला मिळतो. संगीत शारदा, पण लक्ष्यात कोण घेतो, तृतीय रत्न यासारख्या कलाकृती म्हणजे समसजसच्या डोळयात घातलेले अंजन असते. दिगंबर पाध्ये यांच्या मते,"एखादया समाजातील विशिष्ट काळातील जीवनाविषयीची कल्पना, आदर्श जीवनाविषयीचे त्यांचे संकेत, जीवनाविषयीचे त्यांचे भान इत्यादी विषयीचे निष्कर्ष काढण्यासाठी त्या समाजाचे साहित्य ही एक प्रकारे सामग्री ठरू शकते."[२] म्हणून त्या त्या काळातील प्रकाशित श्रेष्ठ कलाकृती त्या त्या काळाच्या समाजजीवनाचे दर्शक असतात. त्यातून समाजातील बदलाची नोंद घेतलेली असते. त्यामुळे समाजावर त्याचा खोलवर परिणाम होत असतो. 'नटसम्राट' किंवा 'एकच प्याला' सारख्या नाटयकृती या समाजिक प्रश्नावर आधारित आहेत. त्यातून कलात्मक उंची तर गाठली गेली आहेच पण सामाजिक भानही राखले गेले आहे. वाचकावर संस्कार करण्याचे काम साहित्य करत असते. काळानुसार समाजात होणारा बरा वाइट बदल हा मराठी साहित्याने टिपलेला पाहायला मिळतो. त्यामुळेच कालखंडानुसार साहित्याचा अभ्यास करावा लागतो. एखादी कलाकृती समजून घ्यावयाची असेल तर तत्कालिन समाजजीवन आणि त्या काळातील महत्वाच्या घडामोडी या माहिती पाहिजेत. केशवसूत, मर्ढेकर किंवा गंगाधर गाडगीळ यांचं साहित्य समजून घ्यायला तत्कालिन परिस्थितीची जाणीव असली पाहिजे. साहित्यिक हा एक संवेदनशिल व्यक्ति असल्यामुळे समाजजीवनात घडणाऱ्या अनिष्ट घटनामुळे तो अस्वस्थ होत असतो. त्यावर विचार मंथन करून आपल्या परीने त्या घटनेचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न तो कलाकृतीतून करत असतो. त्यातून वाचकाला एक विचार, दिशा मिळत असते. सतीश बडवे यांच्या मते,"सशक्त लेखनाची परंपरा पुढच्या पिढीला बळ देत असते. साहित्याचा समाजावर पडणारा प्रभाव हा प्रामुख्याने सांस्कृतिक असतो."[३]

स्वातंत्र्यानंतर शिक्षणाची द्वारं सगळयासाठी खुली झाली सर्वच स्तरातील तरूण शिक्षण घेवू लागला. आपले जीवनानुभव साहित्यातून त्यांने मांडायला सुरूवात केली. आत्तापर्यत ज्या वर्गाचे चित्रण साहित्यातून फारसं आलेलं नव्हतं उदा.



Lecturer
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी ई. त्या- त्या वर्गातील व्यक्तिच आपले जीवनानुभव साहित्यातून मांडू लागल्य. जीवनानुभव प्रकट होवू लागले. मराठी साहित्यामध्ये निर्माण झालेले हे नवीन प्रवाह होत. या प्रवाहानी मराठी साहित्य समृद्ध केले. ग्रामीण जीवनातील प्रश्न ग्रामीण साहित्याने सर्वाच्या समोर मांडले. ग्रामीण जीवनातील अज्ञान, अंध :श्रदधा, दारिद्रय ,निसर्गाचा लहरीपणा, औद्योगिकीकरणामुळे झालेले परीणाम, बदलत गेलेले ग्रामजीवन या सगळयाचे वास्तव चित्रण ग्रामीण साहित्यातून चित्रित झाले आहे. याच पद्धतीने दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य हे वास्तव जीवनानुभवातून आलेले साहित्य आहे. त्यातून त्या त्या समाजगटाच्या भाव भावना, आशा आकांक्षा, इतरांकडून त्यांच्यावर झालेले अन्याय या सर्वांचे चित्रण आलेले पाहायला मिळते. त्यामुळे या दबलेल्या, पिचलेल्या समाजाची व्यथा सगळया समाजाच्या समोर आली. त्यातूनच ग्रामीण साहित्याची चळवळ, दलित साहित्याची चळवळ, स्त्रीवादी साहित्याची चळवळ उभी राहीली. त्या त्या समाजगटाचे प्रश्न सोडवण्यासाठी त्याची मदत झाली. साहित्यामुळे अन्यायाला वाचा ही फुटू शकते. जे काम हाजारो लोक करू शकत नाही ते काम एखादी कलाकृती करू शकते. वैचारिक क्रांतीचं माध्यम साहित्य आहे. म्हणूनच संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे, "आम्हा घरी धन शब्दाचिच रत्ने, शब्दाचीच शस्त्रे यत्न करू." शब्दच सर्व काही आहेत. म्हणून समाजाचे समाजपण टिकवून ठेवण्याचे काम साहित्य करत असते.

**संदर्भ**

१) पाध्ये दिंगबर- साहित्य, समाज आणि संस्कृती, लोकवाङ्मय गृह मुंबई. चौथी आ. २०११ पृ.२०
२) पाध्ये दिंगबर- साहित्य, समाज आणि संस्कृती, लोकवाङ्मय गृह मुंबई. चौथी आ. २०११ पृ.२०
३) डॉ. बडवे सतीश- साहित्याची सामाजिकता, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. प्र.आ.२०१३ पृ.०३
४) बागले प्रभाकर -साहित्य आणि सांस्कृतिक संवेदन, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.प्र.आ.२०१४

Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)